3f

(31)

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ
## राहुरी जि.अहमदनगर

दुरध्वनी क्रमांक :(०२४२६) २४३२२६/२४३३७४ ई-मेल: comptrolle.mpkv@gov.in

जा.क्र. मफुकृवि/ नियंत्रक/परिपत्रक/ २८७/२०१८ दिनांक :- १९/०३/ २०१८

## परिपत्रक

**विषय:-** माहे मार्च २०१८ अखेर वितरीत होणा-या वेतनेतर / आकस्मिक खर्चाच्या अनुदानाच्या विनियोगाबाबत ...

**संदर्भ:-** जा.क्र.मफुकृवि/नियंत्रक/लेखा-२/परिपत्रक/६३/२०१८ दि. २३.०१.२०१८

नियंत्रक कार्यालयाकडून क्षेत्रिय विद्यापीठ कार्यालयांना वेतनेतर / आकस्मिक खर्चासाठी मंजूर अनुदानाच्या अंदाजे ६५ % अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे. उर्वरीत काही अनुदान शासनाकडून प्राप्त झालेले असून आकस्मिक खर्चासाठी निधी वितरीत करण्यात येत आहे. उपरोक्त संदर्भीय परिपत्रकान्वये वेतनेतर / आकस्मिक खर्चात काटकसर करण्याबाबत कळविण्यात आले असून त्यानुसार वितरीत होणारे अनुदान केवळ आवश्यक बाबींवरच खर्च करण्यात यावे.

यास्तव आपल्या विभागातील आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडून सोबतच्या 'प्रपत्र अ' प्रमाणे देयके अदायगीसाठी प्राप्त करुन घ्यावीत.

तसेच सोबत 'प्रपत्र ब' नुसार विभागातील आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडून माहिती भरुन घ्यावी मात्र पुढील सुचना येईपर्यंत देयक स्विकारु नयेत. ही माहिती सोबतच्या प्रपत्रांमधे **Conti. March 2018 grants** या Google Drive - spreadsheet मध्ये दि. २७/०३/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत उपलब्ध करुन दयावयाची आहे.

**नियंत्रक**
**म.फु.कृ.वि., राहुरी**

प्रत कार्यवाहीस्तव :-
१. अति. अधिदान व लेखा अधिकारी, म.फु.कृ.वि., राहुरी
२. अधिदान व लेखा अधिकारी, म.फु.कृ.वि., राहुरी / पुणे / कोल्हापुर / धुळे
३. सहाय्यक नियंत्रक - २ /३ /४ म.फु.कृ.वि., राहुरी

प्रत माहितीसाठी :-
मा.कुलगुरु महोदय यांचे स्वीय सहाय्यक म.फु.कृ.वि., राहुरी

## प्रपत्र अ

( वीज / दुरध्वनी / पाणी शुल्क / मालमत्ता कर/ महसुली कर व शासकीय - न्यायालयीन आदेशांन्वये करावयाची प्रदाने. )

| अ.क्र. | आहरण व संवितरण अधिकारी | योजनेचे नांव | वरील बाबीसाठी प्राप्त अनुदान (रु.) | शिल्लक अनुदान (रु.) | आवश्यक अनुदान (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |

टिप :- वरील देयके स्विकारून प्राथमिक छाननी करूनच- वरील प्रमाणे माहिती सादर करावी. परिपूर्ण व अचूक मागणी याची अधिदान व लेखा अधिकारी यांनी व्यक्तीश: खात्री करावी. (खर्चाच्या वरील अनिवार्य बाबी वगळता इतर खर्च बाबींसाठी)

## प्रपत्र ब

( खर्चाच्या वरील अनिवार्य बाबी वगळता इतर खर्च बाबींसाठी )

| अ.क्र. | आहरण व संवितरण अधिकारी | योजनेचे नांव | खर्चाचे तपशील | प्रलंबित देणे (रु.) | शिल्लक निधी व इतर स्त्रोतातुन उपलब्ध निधी (रु.) | निव्वळ आवश्यक निधी (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |

टिप :- अधिदान व लेखा अधिकारी यांनी

(i) रकाना ०४ व ०५ मधील प्रलंबित मागण्यांची उचित छाननी करावी.

(ii) रकाना ०६ मध्ये नमुद केल्याप्रमाणे शिल्लक निधी पुरेसा नसल्यास, या प्रलंबित मागण्या भागविण्याकरिता त्या योजनेच्या फिरत्या निधीतून (अथवा असल्यास अन्य निधीतून ) या मागण्या भागवाव्यात. अंतीम पर्याय म्हणूण रकाना ०७ मध्ये या कार्यालयाकडे मागणी नोंदवावी.

(iii) देयके वेळीच प्रदान न झाल्याने अथवा प्रलंबित राहिल्यामुळे गुणवत्तेवर व विद्यापीठ कार्यालयाच्या प्रतिष्ठेवर प्रतिकुल परिणाम होतात. यास्तव कोणतेही देयक प्रलंबित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.